महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५६९
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५६ दिनांक ११ / ०५ / २०१७

विषय : म.रा.वि.वि.कं.म. मधील कर्मचाऱ्यांना दि.०१ जुलै २०१६ पासून सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर करणेबाबत.

वाचा : १) प्रशासकीय परिपत्रक क्र.५४४ दि.१९.०९.२०१६
२) शासन निर्णय क्र.मभवा-१११६/प्र.क्र.४४/सेवा-९ दि.२१.०४.२०१७

........

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता वित्त विभाग, शासन निर्णय क्र.मभवा-१११६/प्र.क्र.४४/सेवा-९ दि.२१.०४.२०१७ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व पात्र पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना ०१ जुलै २०१६ पासून सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील (वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय असलेला महागाई भत्त्याचा दर १२५% वरून १३२% केला आहे.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना त्यांचे मूळ वेतनावर **१२५%** ऐवजी **१३२%** अशा सुधारित दराने दि.०१ जुलै २०१६ पासून महागाई भत्ता व दि.०१.०७.२०१६ ते ३०.०४.२०१७ या कालावधीच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचार विनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे.

४. या अनुषंगाने सुधारित दरानुसार महागाई भत्त्याची रक्कम म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील कर्मचाऱ्यांना माहे मे-२०१७ पासूनच्या वेतनामध्ये समाविष्ट करून देण्यात यावी. तसेच सदर सुधारित दराने द्यावयाच्या महागाई भत्याची दि.०१.०७.२०१६ ते ३०.०४.२०१७ या कालावधीच्या थकबाकीची रक्कम माहे मे-२०१७ च्या वेतनासोबत अदा करण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

११/५

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\D.A-Adm.Circular*